RNI No. MAHBIL/2009/31733

# महाराष्ट्र शासन राजपत्र

## असाधारण भाग चार–अ

वर्ष ७, अंक २६] गुरूवार, मार्च १८, २०२१/फाल्गुन २७, शके १९४२ [पृष्ठे २, किंमत : रुपये १५.००

**असाधारण क्रमांक ४७**

**प्राधिकृत प्रकाशन**

**महाराष्ट्र शासनाने केंद्रीय अधिनियमांन्वये तयार केलेले**
**(भाग एक, एक-अ आणि एक-ल यांमध्ये प्रसिद्ध केलेले नियम व आदेश यांव्यतिरिक्त) नियम व आदेश.**

**ग्राम विकास विभाग**

बांधकाम भवन, २५, मर्झबान पथ, फोर्ट, मुंबई ४०० ००१

दिनांक १८ मार्च २०२१.

**अधिसूचना**

**भारताचे संविधान.**

क्रमांक व्हीपीएम २०२०/प्र.क्र.१३२/पंरा.४ (२२).— भारताच्या संविधानाच्या अनुच्छेद २४३ च्या खंड (छ) व महाराष्ट्र ग्रामपंचायत अधिनियम, (१९५९ चा तीन) कलम ४ या संदर्भात काढण्यात आलेल्या पुर्वीच्या सर्व अधिसूचनांचे किंवा संलेखांचे अधिक्रमण करून तसेच याद्वारे प्रदान करण्यात आलेल्या अधिकारांचा आणि यासंदर्भात समर्थ करणाऱ्या इतर सर्व अधिकारांचा वापर करून आणि धुळे **जिल्हा परिषदेची** स्थायी समिती, धुळे जिल्ह्यातील साक्री तालुक्यातील **ग्रामपंचायत** आणि **ग्रामसभा** टेंभे प्र. वार्सा यांच्याशी विचारविनिमय करून, महाराष्ट्राचे राज्यपाल, याद्वारे धुळे जिल्ह्यातील साक्री तालुक्यातील टेंभे प्र.वार्सा, पुनाजीनगर, कुत्तरखांब, जयरामनगर, कैलासनगर, शिवाजीनगर व बागुलनगर या सोबतच्या अनुसूचीतील स्तंभ (३) मध्ये विनिर्दिष्ट केल्याप्रमाणे महसुली गाव किंवा महसुली गावांच्या गटाचा समावेश असलेले स्थानिक क्षेत्र हे ज्या दिनांकापासून स्वतंत्र गाव असेल आणि संविधानाच्या भाग ९ च्या प्रयोजनासाठी अनुसूचीतील स्तंभ (२) मध्ये विनिर्दिष्ट केल्याप्रमाणे टेंभे प्र.वार्सा, पुनाजीनगर, जयरामनगर आणि शिवाजीनगर या नावाने ओळखले जातील तो दिनांक म्हणून १८ मार्च २०२१ हा दिवस विनिर्दिष्ट करीत आहेत.

**अनुसूची**

| अ.क्र. (१) | गावाचे नाव (२) | महसुली गाव किंवा महसुली गावांचा गट (३) |
|---|---|---|
| १ | टेंभे प्र. वार्सा. | टेंभे प्र.वार्सा. |
| २ | पुनाजीनगर. | पुनाजीनगर, कुत्तरखांब. |
| ३ | जयरामनगर. | जयरामनगर, कैलासनगर. |
| ४ | शिवाजीनगर. | शिवाजीनगर, बागुलनगर. |

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

**पं. खं. जाधव,**
शासनाचे उप सचिव.

## RURAL DEVELOPMENT DEPARTMENT

Bandhakam Bhavan, 25, Marzban Path, Fort, Mumbai 400 001
dated the 18th March 2021.

*NOTIFICATION*

CONSTITUTION OF INDIA.

No.VPM-2020/CR- 132/PR-4 (22).— In exercise of the powers conferred by clause (*g*) of article 243 of the Constitution of India, read with section 4 of the Maharashtra Village Panchayats Act ( III of 1959), and of all other powers enabling it in this behalf, and in supersession of all the previous notifications or instruments issued in that behalf, and after consultation with the Standing Committee of the *Zilla Parishad*, Dhule and *Village Panchayat and Gram Sabha* Tembhe Pr. Warsa, in Sakri Tahasil of Dhule District, the Governor of Maharashtra hereby specifies the 18th March, 2021 to be the date from which each of the local areas comprising group of revenue villages or revenue village of Tembhe Pr. Warsa, Punajinagar, Kuttarkhamb, Jayramanagar, Kailasnagar, Shivajinagar and Bagulnagar in Sakri Tahasil, in Dhule District, specified in column (3) of the Schedule appended hereto, shall be the district village and shall be known by the name of the villages Tembhe Pr. Warsa, Punajinagar, Jayramanagar and Shivajinagar, respectively, as specified in column (2) thereof, for the purposes of Part IX of the Constitution.

*SCHEDULE*

| Sr. No. (1) | Name of the village (2) | Group of revenue villages or revenue village (3) |
|---|---|---|
| 1 | Tembhe Pr. Warsa. | Tembhe Pr. Warsa. |
| 2 | Punajinagar. | Punajinagar, Kuttarkhamb. |
| 3 | Jayramanagar. | Jayramanagar, Kailasnagar. |
| 4 | Shivajinagar | Shivajinagar, Bagulnagar |

By order and in the name of the Governor of Maharashtra,

P. K. JADHAV,
Deputy Secretary to Government.

ON BEHALF OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATION, PRINTED AND PUBLISHED BY DIRECTOR, RUPENDRA DINESH MORE, PRINTED AT GOVERNMENT CENTRAL PRESS, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004 AND PUBLISHED AT DIRECTORATE OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATIONS, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004. EDITOR : DIRECTOR, RUPENDRA DINESH MORE.